ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53,
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ४ एप्रिल, १९५१ अंक १४

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंदुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ तें ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानाजिक. फ़ोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. चापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधु, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**रशिआचे नवे रेल्वे-रस्ते**—सैबेरिआंतून मांच्युरिआंत जाणारे रेल्वेचे अनेक नवीन रस्ते रशिआ बांधत असल्याचें समजतें. ह्या रेल्वेजसाठीं १००० डिझेल-इलेक्ट्रिक एंजिनें बांधण्यांत येत आहेत. हीं एंजिनें एकदा जळण घेतलें कीं १,२५० मैलांचा प्रवास करूं शकतील अशीं आहेत. नवीन रस्त्यांपैकीं कांहीं रस्ते कोरिआच्या सरहद्दीपर्यंतहि जातील.

**पाकिस्तान सरकारची बोट-कंपनी**—पाकिस्तानच्या सागरी वहातुकींत गुंतविण्यासाठीं पुरेसें लाजमी भांडवल जमूं शकेल कीं नाहीं तें अजमावून पहाण्यासाठी पाकिस्तान सरकार संबंधितांची एक परिषद भरविणार आहे. पुरेसें भांडवल न जमल्यास सरकार स्वतःच्या मालकीची कंपनी काढण्याचा विचार करीत आहे. १९४७ सालीं पाकिस्तानजवळ ९,८०० टन वजनाच्या व्यापारी बोटी होत्या; आज १,५०,००० टन वजनाच्या बोटी आहेत.

**राजस्थानमधील हात-बनावटीचा कागद**—राजस्थानमधील हात-बनावटीचा कागद तयार करण्याचा धंदा अलीकडे अस्तंगत होण्याच्या मार्गास लागला आहे. हात-बनावटीचा कागद गिरणीतील कागदाशीं बाजारांत स्पर्धा करूं शकत नाहीं हें वरील परिस्थितीचें कारण आहे.

**मनमाडजवळील घायपाताचा धंदा**—मनमाडच्या आसपास चालणारा घायपाताचा धंदा सध्या चांगलाच तेजींत आहे. दर आठवड्याला सुमारे १ लाख रुपयांच्यावर देवघेव होत असावी असा अंदाज आहे. केतकीलाही चांगला भाव येत आहे. त्यामुळें केतकीच्या बनांचें उत्पन्नहि वाढलें आहे.

**सौराष्ट्रांतील रस्ते**—सौराष्ट्र सरकारनें ३० लाख रुपये सिमेंटच्या रस्त्यासाठी खर्च करण्यासाठीं मंजूर केले आहेत. खेडेगांवांना जाणारे रस्ते सडीचे करण्यासाठी २ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. सौराष्ट्रांतील रस्ते सुधारण्यासाठीं आतांपर्यंत ३५.९८ लाख रुपये खर्च झाले आहेत.

**संयुक्त-प्रांतांतील औषधी वनस्पती**—संयुक्त-प्रांतांतील सपाट मैदानांत व डोंगरांत उगवणाऱ्या औषधी वनस्पतींचा आर्थिक विकास करण्यासाठीं सरकार एक योजना हातीं घेणार आहे. ह्या वनस्पतींपासून तयार होणारीं औषधें एकाच दर्जाचीं असावींत आणि त्यांचा खप देशी व परदेशी बाजारपेठेंत व्हावा म्हणूनहि प्रयत्न करण्यांत येणार आहेत. आयुर्वेदीय, युनानी आणि ॲलोपॅथीसारख्या निरनिराळ्या औषधपद्धतींना लागणाऱ्या वनस्पती मुद्दाम लावण्यांत येणार आहेत, असें समजतें.

**चलनवाढीचा धोका**—अमेरिकेनें संरक्षणबाबत खर्चांत वाढ केल्यापासून महागाई आणि चलनवाढ ह्यांनीं थैमान घालण्यास सुरवात केली आहे असे दिसतें. अमेरिकेच्या आर्थिक स्थैर्य विभागाचे प्रमुख मि. एरिक जॉन्स्टन ह्यांनीं नुकतेच असे उद्गार काढले कीं, आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचें निशाण अमेरिकेनें हातीं घरलें असतें तर संरक्षणास जितका धोका पोंचला असता तितकाच धोका चलनवाढीमुळें निर्माण झाला आहे.

**दोनशें वर्षांचा वृद्ध**—पूर्व पाकिस्तानांतील रामपूर (सिल्हेट जिल्हा) ह्या गांवीं २०० वर्षांचा एक वृद्ध हयात असल्याचें खानेसुमारीच्या अधिकाऱ्यांना आढळून आल्याचें समजतें. ह्या इसमाचें नांव रिसालत हुसेन असून त्याला उर्दू, बंगाली, पर्शिअन आणि अरेबिअन भाषा येत असल्याचें तो सांगतो.

**ब्रिटनकडून सिमेंटची निर्यात**—रग्बी पोर्टलंड सिमेंट कंपनी ह्या ब्रिटिश कारखान्यानें गेल्या वर्षी १८,६४,००० टन सिमेंट निर्गत केलें. युद्धापूर्वीच्या कालापेक्षां ही निर्गत तिपटीनें अधिक आहे. कारखान्यांत एकूण उत्पादन ९६,७२,००० टन झालें. ब्रिटनच्या निर्गत व्यापारांत हीं नवीनच भर आहे.

**मोनाझाइटचा कारखाना**—मध्यवर्ती सरकार आणि त्रावणकोर-कोचीनचें सरकार ह्यांनीं मिळून मोनाझाइटचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यासाठीं उत्तर त्रावणकोरमध्यें २५ एकर जागा ताब्यांत घेण्यांत आली आहे. २५ एकर जागेपैकीं ९ एकर जागेची किंमत १,२०,००० रुपये संस्थानच्या विधिमंडळानें नुकतीच मंजूर केली. कारखान्याच्या इमारतीचें काम आधींच सुरू झालें आहे. सर्व जागा भाडेपट्ट्यानें घेण्यांत आली आहे.

**बंगलोर येथील शास्त्रीय संस्था**—इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ह्या बंगलोर येथील संस्थेला देण्यांत येणाऱ्या वार्षिक मदतींत वाढ करण्यांत आल्याचें समजतें. ह्या संस्थेला दरवर्षी ११॥ लाख रुपये मिळत असत. त्या ऐवजीं आता १० लाख रुपये मिळणार आहेत. संस्था करीत असलेल्या कामासंबंधींचा इतरहि योग्य तो खर्च देण्याचा सरकार विचार करीत आहे.

**पुणें विद्यापीठाला सरकारी मदत**—पुणें विद्यापीठाच्या पदवी परीक्षेनंतरच्या अभ्यासक्रमासाठीं आणि संशोधनासाठीं, चालू वर्षी मध्यवर्ती सरकारकडून ८०,००० रुपयांची मदत मिळणार आहे. चालू वर्षी मुंबई सरकारकडून मिळणाऱ्या मदतींतहि ५०,००० रुपयांची वाढ करण्यांत आली आहे.

**विवाहावर कर**—मुंबई विधिमंडळानें ग्रामपंचायत कायद्याला दुरुस्ती करणारें बिल मंजूर केलें. नवीन दुरुस्त कायद्याप्रमाणें ग्रामपंचायतींना विवाहावर कर बसविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें घरपट्टी बसविण्याचा आणि तळीं व विहिरींमधील पाणीपुरवठ्याबद्दलही कर घेण्याचे अधिकार बहाल करण्यांत आले आहेत.

**मध्यभारतांतील हातमागाचा धंदा**—मध्य भारत सरकारच्या औद्योगिक खात्यानें हातमागाच्या धंद्याला मदत करण्याची योजना आखली होती. उज्जैन, रतलाम, इंदूर, इत्यादि ठिकाणचे दोनशे हातमाग ह्या योजनेप्रमाणें चालू करण्यांत आले आहेत. हातमाग विणकरांना सरकारकडून नियंत्रित दरानें सूत पुरविण्यांत येतें आणि कापड विणण्याबद्दल योग्य ती मजुरीहि देण्यांत येते. तयार झालेल्या मालाच्या विक्रीचीहि व्यवस्था करण्यांत येते.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ४ एप्रिल, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक नियोजनाच्या कल्पना

केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजचे प्रो. मॉरिस डॉब सध्या भारतांत आले आहेत. हैद्राबाद येथील प्रोग्रेसिव्ह ग्रुपतर्फे त्यांनीं आर्थिक नियोजनावर नुकतेंच एक व्याख्यान दिलें. त्यांच्या भाषणांतील विचारसरणीकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे.

समाजवादाच्या तात्त्विक चर्चेत आणि व्यवहारांत आर्थिक नियोजनाला प्रमुख स्थान आहे. इंग्लंड-अमेरिका इत्यादि देशांत लोकशाही पद्धतीचें राज्य आहे. परंतु तेथें सुद्धां आर्थिक नियोजनाची कल्पना त्याज्य मानलेली नाहीं. समाजवादाच्या तत्त्वज्ञानांत अंतर्भूत असलेली नियोजनाची कल्पना आणि इंग्लंड–अमेरिकेमधील नियोजनाची कल्पना, ह्यांच्यामध्यें फरक आहे त्याचें विवेचन प्रो. डॉब ह्यांनीं केलें. लोकशाही नियोजनामध्यें सर्व गोष्टी लोकांच्या संमतीनें करण्यांत येतात. लोकशाही नियोजनामध्यें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचें निर्मूलन करण्याचें धोरण स्वीकारण्यांत येत नाहीं. उलट, समाजवादी नियोजनांत मात्र अशा उद्योगधंद्यांचा लय करण्याचें बुद्धिपुरस्सर ठरविण्यांत आलेलें असतें. सर्वसाधारणपणें नियोजनाची कल्पना बहुतेकांना मान्य होण्यासारखी असते; तथापि ही कल्पना रशिआंत ज्या तीव्रतेनें अंमलांत आणण्यांत आली तशी अंमलांत आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला तर रागद्वेषादि वृत्ति उफाळून वर येतात. नियोजनासंबंधीं एक महत्त्वाचा मुद्दा थोर विचारवंतांना देखील नीटसा समजलेला दिसत नाहीं. तो असा : नियोजन वस्तूंचें जसें होऊं शकतें तसेंच तें मनुष्याच्या जीवनाचेंहि होऊं शकतें. ह्या दोन बाबतींत आपण जसें धोरण स्वीकारूं, त्याप्रमाणें नियोजन कडक शिस्तबद्ध ( रेजिमेंटेशन ) अगर जरा लवचिक असें होऊं शकेल. वस्तूंची वांटणी समानतेच्या तत्त्वाला धरून करण्याच्या कल्पनेंत त्रासदायक शिस्तबद्धता येण्याचें कारण नाहीं. परंतु समाजांतील व्यक्तींच्या इच्छांचा विचार न करतां आर्थिक नियोजन करण्यांत येऊं लागलें तर मात्र कडक शिस्तबद्धता आल्याशिवाय रहाणार नाहीं. सर्वसामान्य जनतेच्या हितसंबंधाचे पोषण करणारें आर्थिक नियोजन लोकशाही स्वरूपाचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं ही कसोटी लावली तर रशिआंतील आर्थिक नियोजन हुकूमशाही पद्धतीचें आणि हानिकारकच आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं, असें प्रो. डॉब म्हणतात. सोव्हिएट पद्धतीच्या समाजवादी आर्थिक नियोजनाकडे ऐतिहासिक दृष्टीनेंहि पहातां येण्यासारखें आहे. आर्थिक नियोजनाचें धोरण व दिशा ठरविणें हा फक्त एक भाग आहे. प्रत्यक्ष उत्पादनाचें नियोजन हा दुसरा भाग आहे. सो. रशिआंतील नियोजन सर्वंकष, तपशीलवार आणि विराट स्वरूपाचें आहे. रशिआंतील नियोजनामध्यें प्रत्येक व्यक्तीच्या अधिक पैसे मिळविण्याच्या आकांक्षेचा विचार केलेलाच नाहीं, हा समज निराधार आहे. परंतु एकंदरींत सामाजिक प्रलोभनांचा विचार अधिक केलेला असतो हें मात्र खरें. प्रो. डॉब ह्यांचे विचार भारतांतील नियोजन विरुद्ध व्यक्तिस्वातंत्र्य ह्यासंबंधांतील चर्चेस एक बाजू ह्या दृष्टीनें उद्बोधक वाटतील.

## सावकारी नियंत्रण कायद्यांत दुरुस्ती

### व्याजाचे दरांत लवचिकपणास वाव मिळणार

१९४६ च्या मनी लेंडर्स ॲक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल अर्थमंत्र्यांनीं मुंबई विधिमंडळांत मांडलें आहे. ह्या कायद्याच्या २५ ( १ ) कलमाप्रमाणें तारणावरील कर्जास ६ % आणि हातावरील कर्जास ९ % असे व्याजाचे कमाल दर निश्चित केलेले आहेत. कांहीं कर्जांचे बाबतींत तरी हे दर कमी पडतात असें आढळून आलें आहे आणि सावकारीचे दिलेले परवाने व सावकारीचे व्यवहार हे फारच कमी आहेत असें लक्षांत आलेलें आहे. सावकारी नियंत्रण कायद्यामुळें कर्जांचे व्यवहारांस फारच अडचणी आल्यामुळें कर्ज मिळणें कठीण होऊन बसलें आहे. व्याजाचे दर सध्या कायद्यानेंच निश्चित करून टाकले आहेत, त्या ऐवजीं ते जरूरीप्रमाणें चढते–उतरते ठरविण्याचा अधिकार सरकारकडे ठेवणें सोईचें होईल ह्या दृष्टीनें प्रस्तुत बिलाची योजना आहे. व्याजाचे दर तारणाप्रमाणें ठरवून देतां यावे अशी सरकारची कल्पना आहे. सावकारी नियंत्रण कायद्यांतून बिगर-शेड्यूल्ड बँकांना वगळण्याचाहि सरकारचा इरादा आहे. प्रस्तुत बिल पास झालें, म्हणजे तात्काळ ज्यास्त व्याजानें कर्जें देतां येतील असें मात्र नाहीं. तारणाच्या प्रकाराप्रमाणें व वेगवेगळया क्षेत्रांच्या गरजेप्रमाणें व्याजाच्या दराचा तक्ता तयार करण्यास सरकारास वेळ लागेल. तोंपर्यंत सध्याप्रमाणेंच ६% व ९% हे कमाल दर अंमलांत रहातील.

---

**सरकारी जाहिराती**—१९५० सालीं भारतीय सरकारनें निरनिराळया वृत्तपत्रांत मिळून १०,००० वेळा जाहिराती दिल्या. ह्या जाहिरातींनीं १,५५,००० कॉलम इंच इतकी जागा व्यापली. एकंदर २५६ वृत्तपत्रांतून जाहिराती देण्यांत आल्या. त्यांपैकीं १७९ देशी भाषांतील वृत्तपत्रें होतीं आणि ७७ इंग्लिश होतीं. अधिक धान्य पिकविण्याची मोहीम, वनमहोत्सव, हौशी प्रवाशी, नॅशनल सेव्हिंग्ज, टेरिटोरिअल आर्मी, इत्यादि संबंधींच्या जाहिराती प्रामुख्यानें करण्यांत आल्या.

**स्वस्त रेडिओ**—आफ्रिकेच्या उष्ण हवेला टिकणारा आणि निष्काळजीपणाला दाद न देणारा असा एक रेडिओ तयार करण्यांत आला आहे. त्याचा आकार अल्युमिनमच्या पातेल्यासारखा असून त्याची किंमत अवघी ६ पौंड, ५ शिलिंग आहे. मागासलेल्या देशांतील लोकांना शिक्षण देण्यासाठी ह्या रेडिओचा चांगला उपयोग होईल असें मत युनेस्कोनें व्यक्त केलें आहे. उत्तर र्‍होडेशिआंत अशा प्रकारचे २,००० रेडिओ सेट्स कांहीं आठवड्यांच्या आंतच खपले.

**हातमागाच्या कापडावरील निर्यात जकात रद्द**—हातमागाच्या कापडाच्या निर्यातीवर किंमतीच्या १० टक्के निर्यात जकात घेण्यांत येत असे. ही जकात भारत सरकारनें रद्द केली असल्याचें समजतें. हातमागाचें कापड सोडून इतर कापडावरील जकात मात्र पूर्वीप्रमाणेंच कायम ठेवण्यांत आली आहे.

## महाराष्ट्र बँकेचे श्री. जोग इंग्लंडला जाणार

### बोर्डाचा अभिनंदनीय निर्णय

बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., सी. आय. बी., सी. ए. आय. बी. हे ८ मे, १९५१ रोजीं इंग्लंडला विमानमार्गे निघणार आहेत. तेथें त्यांचा मुक्काम सुमारें ६ महिने होणार असून त्या अवधींत ते बँकिंगच्या संघटनेचा व प्रत्यक्ष कारभाराचा विशेष अभ्यास व निरीक्षण करणार आहेत. महाराष्ट्र बँकेचें डायरेक्टर बोर्डच ह्या कामासाठी श्री. जोग ह्यांना पाठवीत आहे, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. श्री. जोग ह्यांच्या ह्या नव्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्रीय बँकिंगला मिळणार आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्र बँकेनें आपल्या तज्ज्ञ व अनुभवी मॅनेजरास बँकिंगच्या व्यवसायाच्या व्यापक शिक्षणासाठी परदेशीं पाठविण्याचें ठरविलें, ह्यांत बँकेची प्रगति-प्रियता दिसून येते; तसेंच श्री. जोग ह्यांच्या कामगिरीवरील बोर्डाचा विश्वासहि स्पष्ट होतो. ह्याबद्दल दोघेहि अभिनंदनास पात्र आहेत.

## दि बँक ऑफ औंध लि.

वरील बँकेस १९४९ मध्यें ५,३२६ रु. नफा झाला होता; १९५० मधील तिचा नफा ११,०१६ रु. आहे. स्टाफला २,००३ रु. बोनसची तरतूद करून हा नफा झालेला आहे. औंध संस्थान मुंबई राज्यांत विलीन झाल्यामुळें निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्याचा बोर्डाचा सतत प्रयत्न असून मुंबई सरकारकडून कांहीं रकमा त्यानें वसूलहि केल्या आहेत. गेल्या दोन वर्षांतील कित्येक अडचणींतून बँक यशस्वी रीतीनें पार पडली आहे. औंध संस्थानांतील सहकारी सोसायट्यांना बँकेनें दिलेलीं कर्जें सातारा किंवा विजापूर जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी संस्थेकडे अद्याप वर्ग झालेलीं नाहींत. ह्या संबंधांत औंध बँकेच्या वाटाघाटी चालू आहेत. त्या यशस्वी झाल्या म्हणजे ह्या कर्जांत गुंतलेला सर्व पैसा मोकळा होईल. बँकेच्या सर्व शाखा नफ्यांत चालू असून कांहींची प्रगति तर फार चांगली आहे. औंध बँकेच्या ह्या प्रगतीबद्दल चालकांचें अभिनंदन केलें पाहिजे. नफ्यापैकीं २,२८५ रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून आणि ३,५९६ रु. कॉंटिन्जन्सी फंडांत टाकून २½% डिव्हिडंड देण्यासाठीं ४,०४७ रुपयांचा विनियोग करण्यांत येणार आहे. जास्त दरानें डिव्हिडंड देणें शक्य असतांहि डायरेक्टरांनीं मजबुती वाढविण्याचें योग्य धोरण ठेवलें आहे. (चेअरमन:- न. गं. जोशी, बी. ए., एल्एल्. बी. मॅनेजर : बी. डब्ल्यू. घमंडे, सी. ए. आय. आय. बी.)

### संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,६१,९१० | रोख व बँकांत | १,४४,३७३ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७१,२६२ | इनव्हेस्टमेंटस् | ४,८०,४०६ |
| ठेवी | १०,९०,८२९ | कर्जें | ७,४९,०८१ |

### सहकारी ट्रेनिंग क्लास, कळवण

नाशिक जिल्ह्यासाठीं सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें कळवण येथें कळवण तालुका को. सुपरवायझिंग यूनिअनचे ऑफिसांत श्री. दगाजी अजबा पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर, सटाणा यांच्या हस्तें उद्घाटन तारीख २५-३-१९५१ रोजीं दुपारीं ६ वाजतां करण्यांत आलें. नाशिक जिल्ह्यांतील निरनिराळे तालुक्यांतून एकूण ५० विद्यार्थी जमले होते.

### अमेरिकेंतील देवघेव करणारीं यंत्रें

आपल्याकडे स्टेशनवर प्लॅटफॉर्म तिकिटें सटका ओढल्याबरोबर देणारीं यंत्रें आपण पाहिलीं आहेत. ठराविक नाणीं टाकून वस्तू देणारीं यंत्रें अमेरिकेंत फार मोठ्या प्रमाणावर आहेत. १९५० सालीं अमेरिकन लोकांनीं १.०० कोटी डॉलर्सची मोड ह्या प्रकारच्या यंत्रांत टाकण्यासाठीं वापरली. ताज्या कढीपासून शेंगदाण्यासारख्या पदार्थांपर्यंत कोठलाही पदार्थ यंत्राकरवीं मिळूं शकतो. पोस्ट कार्डे, पेन्सिली, सेफ्टी वस्तऱ्याच्या पाती, बर्फ, मुलांचीं खेळणीं, वृत्तपत्रें इत्यादि अनेक प्रकारच्या वस्तू मिळतात. कपडे धुवून त्याला इस्त्रीसुद्धा मारून मिळते. १९५० सालीं पेपरमिंट व दाणे विकणाऱ्या यंत्रांनीं ६,३६,९०,००,००० सौदे केले. पेपरमिंट, लेमन ड्रॉप्स वगैरे विकणाऱ्या यंत्रांची संख्या सुमारें १०,००,००० भरली. १ सेंटपेक्षां अधिक किंमतीचे गोड पदार्थ विकणाऱ्या यंत्रांची संख्या ३,७०,००० भरली. सिगारेटस् विकणारीं ४,०३,००० यंत्रें होतीं, आणि निरनिराळ्या प्रकारचीं पेयें विकणारीं ४,६६,००० यंत्रें होतीं. अमेरिकेंत विकल्या जाणाऱ्या सिगारेटस् पैकीं १८ टक्के सिगारेटस् ह्या यंत्रामार्फत विकल्या गेल्या. लेमन ड्रॉप्स सारख्या साखरेच्या वस्तूंच्या एकूण विक्रीपैकीं १६ टक्के विक्री यंत्रांनीं केली. तथापि अमेरिकेंतील चलनवाढीचा परिणाम यांत्रिक विक्रीलाहि भोगावा लागत आहे. एक कप कॉफीला पूर्वी एक सेंट पडत असे; आतां त्याच कपाला ६ पासून १० सेंटसपर्यंत नाणीं यंत्रांत टाकावीं लागतात. निकेलचें नाणें घेऊन वस्तू देणाऱ्या यंत्रांनीं आतां 'डाइम' नाणें घेण्याची व्यवस्था केली आहे. ह्याचें कारण विक्रेत्यांकडून रोखीनें मिळणाऱ्या पदार्थांचे भाव वाढले आहेत. देशांत किंमती कशाहि वाढल्या तरी अमेरिकेंतील मोड देणाऱ्या यंत्रांनीं आपलें वैशिष्ट्य कायम राखलें आहे. एक 'डाइम'चें नाणें टाकलें तर ह्या यंत्रांतून 'निकेल' चीं नाणीं अजूनही मिळतात.

### कामाबद्दल चिंता आणि पोटांतील गळवें

ब्रिटनमधील मेडिकल हेल्थ कौन्सिलच्या इंडस्ट्रिअल हेल्थ रिसर्च बोर्डानें एक महत्त्वाची तपासणी नुकतीच पुरी केली. कामासंबंधीं चिंता आणि पोटांतील गळवे ह्यासंबंधीं बोर्डातर्फे संशोधन करण्यांत आलें. ह्या दोन घटनांत फार निकटचा संबंध आहे असें आढळून आलें आहे. पोटांतील गळवें आणि व्यवसाय ह्यासंबंधींही चौकशी करण्यांत आली. डॉक्टर्स, फोरमेन, व्यापारी कंपन्यांतील नोकर ह्यांना गळवांची व्यथा बऱ्याच प्रमाणांत असल्याचें दिसून आलें. शेतीच्या व्यवसायांतील लोकांत हें दुखणें फारसें आढळून आलें नाहीं. ज्यांना गळवें झालीं होतीं त्यांनींच कामाबद्दल चिंता व्यक्त केली. ज्यांची पचनक्रिया चांगली होती त्यांनीं अशी चिंता व्यक्त केली नाहीं. घरच्या काळज्या आणि पोटांतील गळवे ह्यांचा मात्र संबंध आढळून आला नाहीं. ही तपासणी करण्यासही कारण झालें. लंडनमधील एका इस्पितळांत १० रोग्यांपैकीं १ रोगी ह्या व्यथेनें पछाडलेला आढळून आल्यानें संशोधन करण्यास सुरवात झाली. संशोधक समितीनें एकूण ६,००० स्त्री-पुरुषांची तपासणी केली. हे सर्व रोगी निरनिराळ्या व्यवसायांतील होते. १०० पुरुषांपैकीं ६ जणांना व १०० स्त्रियांपैकीं दोन जणींना ही व्यथा जडल्याचें आढळून आलें. कामाच्या अनियमित पाळया अगर वेळीं अवेळीं जेवण ह्या कारणांमुळें पोटाचीं गळवें होतात, असें दिसून आलें नाहीं. मोटारींचे ड्रायव्हर्स ह्या व्यथेला विशेष संवेदनशील असतात, असें मानलें जातें, पण तसें कांहीं आढळून आलें नाहीं.

## रेल्वे बजेटावरील चर्चेत आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

रेल्वे बजेटावरील चर्चा माहितीच्या दृष्टीनें विशेष उद्बोधक झाली असें म्हणतां येत नाहीं.

रेल्वे चीफ कमिशनरची जागा रद्द करण्याबाबत आणि रेल्वे अधिकाऱ्यांच्या लांचलुचपतीबाबत शब्दांची भालफेक झाली. स्टेशनवरील दूरध्वनिक्षेपक यंत्रें आणि इतरत्र दुर्मिळ असलेलें, सिमेंट वापरून तयार केलेले प्रत्येकीं १०० रुपये किंमतीचे रेल्वे साईन बोर्डस् यांचा उल्लेख होऊन सरकारच्या कल्पनारम्य योजना मोंगल बादशहांनीं मूर्खपणानें केलेल्या कृतींची आठवण देणाऱ्या असल्याचें सांगण्यांत आलें! आजच्या बिकट परिस्थितींत उतारू वहातुकीच्या दरांत वाढ करणें 'हृदयहीनत्त्व' दर्शवितें! एका सभासदानें रेल्वे मंत्री व त्यांचे सहकारी अर्थमंत्री यांच्या बुद्धिचातुर्याची मुक्त कंठानें स्तुति करून त्यांना बजाविलें:—"आपण दोघांनीं अजून निवडणूक पाहिलेली नाहीं. आपण निवडणुकींत उभे रहाल कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. हें असलें बजेट करून आपण निवडणुकीला उभे राहून निवडून येऊन दाखवा!"

टीकास्त्राबरोबरच स्तुतीचाही वर्षाव झाला. "कुरुक्षेत्राच्या रणांगणावरील विजयी पांडवांच्या रथाचे सारथी श्रीकृष्ण" अशा शब्दांत रेल्वे मंत्र्यांचा गौरव करण्यांत आला!

लोकप्रतिनिधींनीं केलेल्या टीकेची दिशा:—

१९३८ च्या मानानें तेवढ्याच जागेंत प्रवास करणाऱ्या उतारूंची संख्या १९५० मध्यें तिप्पटीनें वाढली आहे, अशा स्थितींत तिसऱ्या वर्गाच्या दरांत वाढ करणें योग्य नाहीं. वाढ केलीच तर ती एवढी नको. निदान पॅसेंजर आणि मेल दर कमी-जास्त असूं नयेत. दरांत वाढ करावयाचीच तर उतारूंना अधिक सुखसोयी तरी द्या. रेल्वे कमिशनरची जागा कमी करण्याबाबत व आतांच रेल्वेची नवीन गटवारी करण्याबाबत अनुकूल व प्रतिकूल मतें प्रदर्शित करण्यांत आलीं. रेल्वे खर्चांत कोळसा खातीं रु. ३० कोटी पडतात, त्यांत रेल्वेचे रु. ६ कोटींचें नुकसान येत आहे. १९४५ पेक्षां १९५० मध्यें अदमासें १२ लक्ष टन कोळसा अधिक लागला! उतारूंच्या डब्यांकरितां फक्त रु. ६,४५,००० ची व्यवस्था नवीन बजेटांत आहे, ती अत्यंत अपुरी आहे.

रेल्वे मंत्र्यांनीं सांगितलेली कांहीं माहिती—

तिसऱ्या वर्गांत बसावयाच्या जागा आणि त्या वर्गांतून प्रवास करणारे उतारू यांचें प्रमाण १९४९ मध्यें १०० टक्क्यांहून अधिक होतें; १९५० मध्यें ८१ टक्के होतें; १९५१ मध्यें तें ६६$\frac{2}{3}$ टक्के यावें अशी खटपट आहे. हें प्रमाण ५० टक्के असलें म्हणजे सुखाचा प्रवास होतो.

गेल्या दोन–तीन वर्षांत पुष्कळशीं इंजिनें हातीं आलीं आहेत. माल वहातूकहि सुधारली आहे. मुख्य अडचण आहे ती उतारू डब्यांची! भरपूर डबे हातीं आल्याखेरीज आजची गर्दीची स्थिति बदलणार नाहीं. रेल्वे लाईन नवीन घालायची तर दर मैलाला ५ ते १० लाख रु. खर्च येतो. अमेरिकेंतील रेल्वे-मार्गाची एकूण लांबी २,२०,००० मैल असून रेल्वे नोकरांची संख्या १५,००,००० भरेल. भारतांतील हे आंकडे अनुक्रमें ३३,००० आणि १०,००,००० असे आहेत

अमेरिका आणि भारत यांतील रेल्वे लाईन एकाच लांबीची धरली तर दोन देशांतील कामगारांचें साधारण प्रमाण १ : ८ पडतें. भारताच्या मानानें अमेरिकन रेल्वे लाईन १० पट असून कामगार संख्या फक्त १$\frac{1}{2}$ पट आहे. एकूण पगार आंकडा लक्षांत घेतला तर भारतांतील रेल्वे कामगारांना अमेरिकन किंवा इंग्लिश रेल्वे कामगारांच्या बरोबरीनें पगार मिळतो.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना १९१८)
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव

## दि भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें

अध्यक्ष, श्री. बी. बी. वाळवेकर, यांचें १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील भाषण, ता. २५-३-५१.

"आर्थिक मंदीमुळें सर्वसाधारणतः बँकांमधील ठेवींवर परिणाम झालेला आहे. अशी वस्तुस्थिति असतांना आपल्या बँकेच्या ठेवींत सुमारें अडीच लाखांची वाढ झालेली आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. चालू वर्षी ठेवीमध्यें रु. २,४३,००१ इतकी वाढ झाली असून कर्जामध्यें रु. १,१८,९७५ इतकी वाढ झालेली आहे. कर्जें देत असतांना तारणावरील कर्जें देण्याचें धोरण विशेषेंकरून अंमलांत आणल्यानें चालू वर्षी एकूण रु. २७,४२,११९ च्या कर्जामध्यें तारणावरील कर्जें रु. १७,४१,५६० व हातावरील कर्ज फक्त रुपये ६,४९,९६१ इतकींच आहेत. पूर्वीच्या दोन वर्षांचे म्हणजे सन १९४८ व सन १९४९ या सालांचे हातावरील कर्जांचे आंकडे अनुक्रमें रु. १०,४०,५४९ व रु. ९,१७,०२८ असे होते.

"कर्जांची मागणी मात्र दिवसेंदिवस वाढती आहे. तथापि एकंदर कर्जांचे प्रमाणांत फारशी वाढ झालेली नाहीं असेंच आपणांस दिसून येईल. सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणूक १९४९ अखेर रु. २०,१८,३१२ इतकी होती. त्यांत चालू सालीं रु. दोन लाखांची वाढ होऊन ती रु. २१,९८,३३० इतकी झाली आहे. रोख्यांतील बाजारभाव, व खरेदीच्या किंमतीमधील फारकती ह्यांची तरतूद करणेचे दृष्टीनें बँकेनें डिप्रिसिएशन फंड काढला असून दरसाल त्यांत भर घालण्याचें धोरण ठेविलें आहे.

"दिवसेंदिवस उत्पन्न कमी होत जाऊन खर्च मात्र वाढत जाईल अशा कल्पनेनें लहान बँकांचें एकत्रीकरण केलें जावें असें सुचविलें जात आहे. तथापि बँकांचे एकत्रीकरणाचा हा प्रश्न ज्या त्या संस्थेपुरता मर्यादित म्हणूनच त्याचा विचार केला पाहिजे. प्रत्येक संस्थेला आपल्या काय अडचणी आहेत व त्या अडचणींना तोंड कसें दिलें पाहिजे याचा विचार त्या त्या संस्थेनें करून आपलें धोरण आखलें पाहिजे. एखादी बँक लहान आहे म्हणूनच तिनें दुसऱ्या बँकेंत सामील व्हावें हें म्हणणें बरोबर होणार नाहीं. लहान संस्थांचेंहि स्वतंत्र कार्यक्षेत्र असतें व अशा संस्थाहि आपापले क्षेत्रांत कार्य चांगल्या प्रकारें करूं शकतात. बँकिंग कंपनीचा कायदा अस्तित्वांत आला असून सर्व बँकांचें नियंत्रण मध्यवर्ती रिझर्व्ह बँककडे आलें आहे, व त्या दृष्टीनें बँकिंगचे व्यवहारांत एकसूत्रीपणा येण्यास सुलभता होईल. एखादी बँक कार्यक्षम असूनहि केवळ ती लहान आहे म्हणून तिनें दुसऱ्या बँकेशीं संलग्न व्हावें, असें म्हणणें हितकारक ठरणार नाहीं."

### कमर्शिअल बँकेचे श्री. साळोखे ह्यांचा मृत्यु

कोल्हापूर येथील दि कमर्शिअल बँक लि. चे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गणपतराव लक्ष्मणराव साळोखे हे १८ मार्च, १९५१ रोजीं आकस्मित हृदयविकारानें मृत्यु पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. शालेय शिक्षणाचा पाया नसतांनाहि अगदी गरिबींतून वर येऊन कै. गणपतरावांनीं कोल्हापूरच्या बँकिंगच्या क्षेत्रांत आपल्या महत्त्वपूर्ण कामगिरीनें विशेष स्थान प्राप्त करून घेतलें होतें.

संसदेंत—

## आर्थिक अभिवृद्धीची निकड

संसदेंत अर्थसंकल्प सादर करतांना अर्थमंत्र्यांनीं आर्थिक समस्यांचें दिग्दर्शन केलें होतें.

अर्थसंकल्पावरील प्राथमिक चर्चेत लोकप्रतिनिधींनीं देशांतील गंभीर परिस्थितींचें भावपूर्ण आणि विदारक शब्दांत वर्णन केलें. स्वराज्यांतील तीन वर्षांत भूकप्रश्न सुटलेला नसून उग्रतर स्वरूप धारण करीत आहे. "अधिक धान्य पिकवा" आणि वनमहोत्सव यापायीं कोट्यावधि रुपये खर्ची पडले. स्वयंपूर्णतेच्या घोषणेच्या निमित्तानें धान्याची पुरेशी आयात वेळेवर केली नाहीं; आणि आतां अन्नाकरितां, वस्त्राकरितां लागणाऱ्या कापसाकरितां देशो-देशीं भीक मागण्याचा व तोंड वेंगाडण्याचा प्रसंग आपल्यावर आला आहे! दोन लक्ष घरांच्या योजना कागदावरच राहिल्या. रामराज्याच्या कल्पना हवेंत विरल्या.

देशाची आर्थिक परिस्थिति बरवर दिसते त्यापेक्षां गंभीर आहे. खर्चाचीं तोंडें पुष्कळ; पण पैसे उभे करण्याचे मार्ग संपुष्टांत येत आहेत. अशा स्थितींत हे दारुबंदीसारखे खर्चिक ध्येयवाद कशाला?

सरकारी खात्यांतील पैशांची वारेमाप उधळपट्टी आणि लांचलुचपत, कामांतील बेजबाबदारपणा, व्यापाऱ्यांची साठेबाजी, आणि काळा बाजार ह्या साऱ्या मानव-निर्मित घटना. सरकार-जनता, मालक-मजूर, जमीनदार-शेतकरी, व्यापारी कोणी सुखी नाहीं. सर्वच जण अगतिक. अशा स्थितींत एका हुरूपेनें प्रयत्न व्हावेत कसे? माणसें केवळ अडचणींनीं नाउमेद होतात असें नव्हे; प्रभावी नेतृत्वाच्या अभावीं राष्ट्रांत अगतिकत्वाची भावना निर्माण होते.

जनतेची, विशेषतः मध्यम वर्गाची अवस्था अत्यंत कठीण झाली आहे. नवीन कर-दर-वाढीनें महागाईंत आणखी भरच पडत आहे. अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजाही भागवितां येत नाहींत अशा स्थितींत लोक शांत राहतील अशी अपेक्षा करणें योग्य नाहीं. परिस्थिति अशीच राहील तर चँग कै शेकच्या राजवटीची वाटचाल आपली नवीन लोकशाहीहि चालूं लागेल!

रेल्वे दरांत वाढ आणि करवाढ या रूपानें ५० कोट रुपये सरकार जमा करणार आहे. ते योग्य कारणीं लागणार आहेत का? आर्थिक स्थिति सुधारणार आहे का? गेल्या वर्षांत ६३ कोटी रुपयांनीं चलन वाढलें. हें कसें झालें? असें पुन्हां होऊं नये म्हणून सरकार काय करणार आहे? सरकारी खर्चांत, संरक्षण खर्चांत, सरकारी उद्योगधंद्यांत, योजनांत, काटकसरीला पुष्कळच जागा आहे.

अर्थमंत्र्यांनीं जमा-खर्चाची तोंडमिळवणी कशीबशी केली आहे. जी परिस्थिति घडविण्यांत त्यांचा भाग नव्हता अशा परिस्थितीचे ते दास आहेत. प्राप्त परिस्थितींत जास्तींत जास्त चांगल्या प्रकारें अर्थसंकल्प सजविण्याचें काम त्यांनीं केलें आहे.

उत्तरादाखलच्या अर्थमंत्र्यांच्या भाषणांत आवेश, अधिकार आणि अपेक्षा यांचा सुंदर मिलाफ असून परिस्थितीवर मात करण्याचा कृतनिश्चय आढळतो. साऱ्याच टीकाप्रश्नांचीं उत्तरें त्यांनीं दिलेलीं नसलीं तरी त्यांना परिस्थितीची जाणीव आणि उपाययोजनांची निश्चित कल्पना असल्याचें दिसतें.

त्यांच्या अर्थसंकल्पाचें सूत्र असें:—महागाई वाढूं द्यावयाची नाहीं. त्याकरितां खर्चाची तोंडमिळवणी सद्यःपरिस्थितींत शक्यतों नवीन कर बसवून करावयाची. सरकारी अवास्तव खर्च व पैशांची उधळपट्टी यांवर शक्यतोंवर नियंत्रण ठेवणें जरूर आहे, असें इतर सदस्यांसारखेंच त्यांनाही वाटत असल्याचें थोडक्यांत सांगून अधिक खुलासा त्यांनीं केला नाहीं. मुंबईंतील जीवनक्रमांकांत नवीन करवाढीमुळें १·१५ आणि रेल्वे दरवाढीमुळें ·३३ एवढी वाढ होईल असें त्यांनीं सांगितलें.

उद्योगधंद्यांना भांडवल कमी पडलें म्हणून लगेच उत्पादनांत घट झाली आणि म्हणून महागाई वाढली असें नाहीं. कच्चा माल-पुरवठा कमी असल्यानें ताग आणि कापडधंद्यांत उत्पादन कमी झाल्याचें त्यांनीं आग्रहानें सांगितलें. औद्योगिक उत्पादन वाढत असल्याचें त्यांनीं आंकडेवारीनें दाखवून दिलें. कर आणि उत्पादन यांचा तसा कांहीं संबंध नाहीं असेंही त्यांनीं सांगितलें.

बँका आणि विमा कंपन्या, तसेंच वरचा मध्यम वर्ग हेच आतांपर्यंत सरकारला व उद्योगधंद्यांना भांडवल पुरविणारे होते. त्या अर्थानें भांडवलदार वर्गानें भांडवलाचा पुरवठा केलेला नाहीं. देशांत सामाजिक आणि घटनात्मक बदल झाले आहेत, महागाई वाढत आहे, निरनिराळ्या वर्गांतील उत्पन्नांत फरक पडत आहेत, जुन्या जागीं नवीन वर्ग भांडवल पुरवण्याकरितां पुढें यावयास पाहिजेत. त्याकरितां कांहीं वेळ लागत आहे, आणि तसा तो लागणें कांहींसें अपरिहार्य आहे.

सारेच खाजगी धंदेवाले, भांडवलदार, कारखानदार, सहकार्य करीत नाहींत असें ऊठसूट म्हणणें योग्य नाहीं! चांगली मंडळी निवडून त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे.

सरकारनें अधिकाधिक धंदे चालवायला घेतले पाहिजेत, (राष्ट्रीयीकरण या शब्दांचा उच्चार अर्थमंत्र्यांनीं केलेला नाहीं) असें म्हणणें केवळ अव्यवहारी ध्येयवाद आहे. ज्या ठिकाणीं, जरूर पडेल तेथें हातीं असलेला पैसा आणि माणसें लक्षांत घेऊन तो खाजगी धंदा सरकार हातीं घेईल. नोकरशाहींतील मंडळी मोठ्या कष्टानें, धीरानें नवीन जमाना आणि वाढतीं कामें सांवरीत आहेत. अशा स्थितींत सरकारी कार्याचीं क्षेत्रें वाढविण्यांत घिसाडघाई केली तर आपली नवीन लोकशाही कोसळून पडेल, अशी भीति अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केली.

मोठाल्या नद्या अडवून वीज निर्माण करणें, पाटबंधारे काढून अधिक जमीन पिकाखालीं आणणें, अशा निरनिराळ्या योजना आहेत. त्यांचे व्यवहार-व्यवस्थेंतील दोष दाखविण्याचे प्रसंग माझेवर येतात असें सांगून अर्थमंत्री पुढें म्हणाले, "या योजना पुऱ्या केल्यासेरीज अन्न-धान्याचा प्रश्न कसा सुटणार? आटणाऱ्या नद्या अडविण्याच्या लहान तावडतोबीच्या योजनांनीं कार्यभाग कसा होणार? मोठाल्या योजनांना कालावधि लागणार हें उघड आहे. त्याकरितां कांहींही करून पैसा उभा केलाच पाहिजे."

"ही भारतभूमि सर्वसामान्य जनांची आहे. आपल्या मुलां-नातवंडांकरितां स्वार्थत्याग करा. सरकारला कररूपानें पैसा द्या, असें त्यांना सांगण्यांत मी कांहीं चूक करीत आहे असें मला वाटत नाहीं. राष्ट्राची आर्थिक अभिवृद्धि हीच आज निकडीची बाब आहे. परिस्थितीचें हें आपल्याला आव्हान आहे. नैराश्यवादाला आणि हळुवारपणाला आज जागा नाहीं हाच माझा संदेश" अशा स्फूर्तिदायक शब्दांत अर्थमंत्र्यांनीं चर्चेचा समारोप केला.

## पुण्यांतील घरबांधणी व जागेचा प्रश्न

( श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष, पुणे घरभाडेकरू संघ )

भाडेकरूंचे हाल कमी होण्याचीं कांहीं लक्षणें आपल्यास दिसत आहेत काय ? दोन महिन्यांपूर्वी पुणें महापालिकेतर्फे इमारतींच्या बांधकामासंबंधीं आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. त्यावरून कांहीं वृत्तपत्रांनीं 'घरांची कमतरता दूर होत आहे' असे मथळेहि घातले आहेत. परंतु खरोखरच या घरांचा उपयोग सर्वसाधारण भाडेकरूवर्गाला होतो आहे काय ?

घरभाडेकरू संघाकडे ज्या भाडेकरूंच्या तक्रारी आल्या आहेत व न्यायालयांत ज्यांच्याबाबत दावे चाललेले आहेत त्यांपैकीं बहुसंख्य भाडेकरू तीन रुपयांपासून २५ रुपयांपर्यंत भाडें देणारे आहेत. अशा भाडेकऱ्यांची सोय या नवीन घरबांधणीनें होते काय, हा खरा प्रश्न आहे. १९४८-४९ सालांत ३७५ इमारती बांधण्यांत आल्या व १९४९-५० सालांत ६६१ इमारती बांधल्या गेल्या. या इमारतींतून ५५० कुटुंबांची राहण्याची सोय झाली असें सांगण्यांत येतें. परंतु, या इमारतींपैकीं जुन्या पाडून नवीन किती बांधल्या याचा उल्लेख लागत नाहीं व ज्या इमारती बांधल्या गेल्या त्यांत राहावयास गेलेल्या भाडेकऱ्यांना किती भाडें पडलें हेंहि समजत नाहीं. शंभर-सव्वाशें रुपये भाड्याच्या जागा कांहीं कांहीं रिकाम्या आहेत व त्याबाबत घरमालकाला भाडेकरी कसा मिळेल याची विवंचनाही वाटते आहे; परंतु ज्यांची ऐपत ३ ते २५ रुपयांपर्यंत भाडें खर्चण्याची आहे त्यांची काय सोय ? त्यांनीं गांवांतील आपली ३ ते २५ रु. ची खोली अगर घर सोडलें कीं, नवीन जागा अगोदर या आटोक्यांतली त्यांस मिळतच नाहीं. त्यांतून एखादी मिळाली तर काम सगळें व्यस्त प्रमाणांत जागा कमी व भाडें जास्त. सर्वसाधारण माणसास हें कसें झेपणार ? नुसतीं नवीं घरें बांधलीं जाऊन उपयोगी नाहींत तर तीं वर वर्णिलेल्या लोकांच्या सांपत्तिक सामर्थ्याच्या आवाक्यांतील असावयास पाहिजेत. त्या दृष्टीनें विचार करावयास लागल्यास निराशाच पदरांत येते.

मध्यमवर्गीयांच्या घराचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें सहकारी संस्था स्थापन झाल्या, परंतु त्यांस घरें बांधावयास खुली जागा व बांधकामाचें साहित्य याबाबत सरकारचें जें सहकार्य लाभावयास पाहिजे होतें तें न मिळाल्यामुळें कागदोपत्रीं अशा सहकारी संस्थांची संख्या वाढलेली दिसली तरी प्रत्यक्षांत एकाही संस्थेचें काम यशस्वी झालेलें आढळून आलें नाहीं. पुणें महापालिकेनें पाडिक इमारती पाडण्याच्या आपल्या कार्यक्रमास पूरक म्हणून नवीन इमारती बांधाव्यात व त्याही तीन ते दहा रुपयांच्या भाडेकरूंकरतां बांधाव्यात अशी घरभाडेकरू संघानें सूचना केली होती. परंतु त्या गोष्टीचा विचार महापालिकेकडून अद्याप झालेला नाहीं.

एवंच, घर-बांधणीनें भाडेकरूंच्या हालांत कांहीं संक्षेप झाला कीं काय या प्रश्नाचा विचार करूं लागलें असतां तो झालाच नाहीं असें म्हणावें लागेल. शिवाय घरांची कमतरता दूर होत आहे असें म्हणणें दिशाभूल करणारें आहे. पुण्याची लोकसंख्या दोन लक्ष सत्तर हजारांवरून या दहा वर्षांत चार लक्ष ऐंशी हजारांवर गेली आहे व त्यांची सोय नवीन घरांनीं बिलकूलच झालेली नाहीं. पुण्यांतला घरांच्या कमतरतेचा प्रश्न अजून कायम आहे एवढेंच नव्हे तर तो जास्तच बिकट झालेला आहे.

---

## बँक ऑफ पूना लि.

वरील शेड्यूल्ड बँकेचें उत्पन्न १९५० मध्यें १९४९ चे मानानें १०,६०० रुपयांनीं वाढून तें १,५१,०८८ रु. झालें. सर्व खर्च व दिलेलें व्याज वजा केल्यावर ३०,८१४ रु. नफा रहातो. त्यांत शिलकी नफा मिळविल्यावर विनियोग खालीलप्रमाणें करण्यांत येईल:—

७,००० रु. रिझर्व्ह फंड
१४,००० रु. करासाठीं तरतूद
१,००० रु. प्राथमिक खर्च
८,००० रु. ब्रोकरेज
९०० रु. पुढील वर्षांत ओढणें

बँकेचें वसूल भांडवल १२,५०,००० रु असून ठेवी २५ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेस अल्प दरांत ठेवी मिळवितां येतात, हें प्रत्यक्ष दिलेल्या व्याजाच्या अल्प रकमेवरून दिसून येतें. उलट, बँकेनें व्याजाचें उत्पन्न चांगलें मिळविलें आहे. बँकेनें १२,३२,८२७ रु. रोख व बँकांत ठेवले असून ६,३६,२१४ रु. ची इन्व्हेस्टमेंट आहे आणि १७,४२,४७३ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत. वरील तपशिलावरून बँकेचा भक्कमपणा आणि तिच्या पैशांचा तरलेपणा स्पष्ट होईल. ( चेअरमनः शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया. मॅनेजर: गोविंद गंगाधर साठे, ए. बी. आय. लंडन )

---

## संयुक्त प्रांतांतील स्टेट-ट्रॅन्सपोर्ट

संयुक्त प्रांतांतील स्टेट ट्रॅन्सपोर्ट संबंधीं विधिमंडळांत नुकतीच चर्चा करण्यांत आली. प्रांताचे वहातूक-मंत्री श्री. लाल बहादूर शास्त्री म्हणाले कीं राष्ट्रीय मालकीच्या करण्यांत आलेल्या स्टेट ट्रॅन्सपोर्टच्या व्यवस्थेच्या भवितव्यतेचा सरकार विचार करीत आहे. मोटार-वहातुकीच्या व्यवसायांत रेल्वेजना भागीदारी देऊं करण्यांत आलेली आहे. अशी भागीदारी पत्करण्यास रेल्वेज तयार आहेत असें दिसतें. त्याचप्रमाणें खाजगी मालकांना भागीदारी देतां येईल कीं नाहीं ह्यासंबंधींहि विचार चालू आहे. स्टेट ट्रॅन्सपोर्ट कायद्याप्रमाणें रस्त्यावरील वहातूक रेल्वेज आणि इतर भागीदार ह्यांच्या सहकार्यानें चालविण्याचा अधिकार सरकारला देण्यांत आलेला आहे. संयुक्त प्रांतांतील रस्त्यावरील वहातुकीसंबंधीं चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत आली होती. त्या कमिटीनें स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन स्थापन करण्याविषयीं सूचना केली होती. मुंबईतील स्टेट-ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनचा कारभार कसा चालला आहे तें पहाण्यासाठी संयुक्त प्रांत सरकारनें एका अधिकाऱ्याला पाठविलें आहे. संयुक्त प्रांतांतील रस्त्यावरील वहातुकीला फॅक्टरी ॲक्ट सध्या लागू करण्यांत आलेला नाहीं. औद्योगिक तंट्यासंबंधींचा कायदाहि लागू करण्यांत आलेला नाहीं. प्रांताच्या वहातूक-व्यवस्थेंतील कानपूरच्या कामगारांनीं नुकताच संप केला होता. परंतु हे तंटे तडजोड-कमिटीकडे सोपविता आले नाहींत; कारण तशी कायदेशीर सोय नाहीं. त्यामुळें सरकार आणि कामगार-संघ ह्यांना प्रत्यक्षच वाटाघाटी कराव्या लागल्या. वरील प्रकारचे कायदे स्टेट-ट्रॅन्सपोर्टला लावणें सरकारला योग्य वाटत आहे. राज्यांतील ही व्यवस्था नुकसानींत चालत आहे हें म्हणणें खरें नाहीं. उलट, हा प्रयोग फार यशस्वी झाला आहे. १९५० सालीं सुमारें ३ कोटी रुपये भांडवलावर १९.७८ लाख रुपये नफा झाला आहे. झाल्या कामगिरीचा फायदा घेऊन राष्ट्रीय मालकीच्या वहातुकीचा अधिक विस्तार करण्याचा सरकारचा विचार आहे.

## भारताच्या राजधानींतील घरांची टंचाई

भारतामधील सर्वच मोठ्या शहरांतून रहाण्याच्या घरांची टंचाई परमावधीला पोंचलेली आहे. दिल्ली भारताची राजधानी असली तरी तीहि या परिस्थितींतून सुटलेली नाहीं. सामान्य नागरिकांना तर ही टंचाई जाणवतेच; पण सरकारी नोकरांनाहि घरांबाबत अडचणी सोसाव्या लागत आहेत. मध्यवर्ती सरकारच्या नोकरवर्गापैकीं सुमारें ७५ टक्के लोकांना सरकार अजून घरें पुरवूं शकलेलें नाहीं. १९३९ सालीं घरांसाठी ११,००० अर्ज आलेले होते, आणि मिळूं शकणाऱ्या घरांची संख्या ७,००० होती. १९५० सालीं रहात्या जागेसाठी ७९,८७७ अर्ज करण्यांत आले होते. प्रत्यक्ष जागा मात्र १७,२१९ लोकांनाच मिळूं शकली. दिल्लींतील घरांची संख्या आतां १७,०००पर्यंत आलेली असली तरी मागणीहि खूपच वाढली आहे. १९४८ साली घरांसाठीं ७०,००० अर्ज आले होते. १९४९ सालीं ७४,६२८ अर्ज आले; ह्यावरून वाढत्या मागणीची कल्पना येईल. अशा परिस्थितींत खाजगी मालकीचीं घरें सक्तीनें ताब्यांत घेऊन जागेचें वांटप करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. दिल्ली, सिमला, मुंबई व कलकत्ता ह्या शहरांत मिळून ४३८ घरें सरकारनें ताब्यांत घेतलेलीं आहेत. शिवाय नव्या घरांची बांधणीहि करण्यांत आली. १९५० मध्यें दिल्लींत सरकारनें २०० घरें अधिकाऱ्यांना रहाण्यासाठीं बांधलीं, २,००० घरें कारकुनांना रहाण्यासाठीं बांधण्यांत आलीं आणि १,२५० पट्टेवाल्यांसाठीं बांधण्यांत आलीं. दिल्लींत संस्थानिकांच्या मालकीचे मोठमोठे प्रासाद बरेच आहेत. त्यांपैकीं ११ राजवाडे सरकार वापरीत असून आणखीहिं कांहीं नव्यानें ताब्यांत घेण्याचा विचार चालू आहे. बहुतेक राजवाड्यांचा कांहीं भाग सार्वजनिक कामासाठी वापरला जात आहेच. दिल्लींतील रहाण्याजेवणाची सोय करणारीं मोटमोठीं हॉटेलेंहि सरकारच्या नजरेंतून सुटलेलीं नाहींत. अशा हॉटेलांपैकीं २५ टक्के जागा सरकारनें आपल्या नियंत्रणाखालीं घेतलेलीं आहे. रहात्या जागेची जशी टंचाई आहे तशीच कचेरींसाठी लागणाऱ्या जागेचीहि आहे. त्यामुळें १९५० सालीं कांहीं कचेऱ्या दिल्लीहून बाहेर हलविण्याचा निर्णय सरकारनें घेतला. १९३९ सालीं कचेऱ्यांसाठी लागणाऱ्या जागेचें क्षेत्रफळ सुमारें ८,००,००० चौरस फूट होतें. १९५० सालीं ही जरूरी ६२,५६,३८६ चौरस फूट भासूं लागली, पण मिळूं शकणारी जागा मात्र ५७,९३,५७१ चौरस फूटच होती.

---

**रोल्स रॉइस मोटारींचा नवा कारखाना**—रोल्स-रॉइस ह्या सुप्रसिद्ध मोटारीच्या कारखान्यांत आतां विमानांचीं एंजिने तयार करण्यांत येणार आहेत. त्यासाठी ग्लासगो नजीक ५,००,००० चौरस फूट क्षेत्रफळाची नवीनच इमारत बांधण्यांत येणार आहे. एंजिनांच्या प्रत्यक्ष निर्मितीस प्रारंभ सुमारें दीड वर्षानें होईल. नव्या कारखान्यांत ४ ते ५ हजार कामगार काम करतील.

**म्हैसूर संस्थानांतील कापसाची लागवड**—मध्यवर्ती सरकारकडून १९,३०६ रुपयांची मदत घेऊन म्हैसूर सरकारनें कापसाच्या लागवडीची एक योजना अंमलांत आणली होती. कापसाच्या लागवडीचें क्षेत्र ६८,००० एकरांवरून आता १,००,००० एकरांवर आलें आहे. चालू कापसाच्या हंगामांत मध्यम व लांब धाग्याचा कापूस मिळून २५,००० गांसड्या कापूस तयार झाला.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाल्वेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )


| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९२,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

एकूण खेळतें भांडवल ५२ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगाव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८





हें पत्र पुणें, पेट मांगुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.